**मे.सप्तश्रृंगी अलॉयज प्रा.लि., गट नं. ५१ व ५२, गाव दरेगाव, ता. जालना,जिल्हा जालना, महाराष्ट्र या उदयोगाच्या प्रस्तावित प्रकल्पामध्ये ४,६०,००० टी.पी.ए. एम.एस. बिलेटस उत्पादनाकरिता प्रवर्तन भटटी व ४,५०,००० टी.पी.ए. टी.एम.टी. बारस चे उत्पादन करणे बाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचा इतिवृत्तांत:**

..............................................................................................................

मे.सप्तश्रृंगी अलॉयज प्रा.लि., गट नं. ५१ व ५२, गाव दरेगाव, ता. जालना, जिल्हा जालना, या उदयोगाच्या प्रस्तावित प्रकल्पामध्ये ४,६०,००० टी.पी.ए. एम.एस. बिलेटस उत्पादनाकरिता प्रवर्तन भटटी व ४,५०,००० टी.पी.ए. टी.एम.टी. बारस चे उत्पादन करणे बाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी मा. जिल्हाधिकारी, जालना यांचे अध्यक्षतेखाली दि. ०४ सप्टेंबर २०२० रोजी सकाळी ११:३० वाजता प्रस्तावित स्थळी घेण्यात आली.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबइ यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-०५ / २०२० पत्र क्रं. बी.ओ. / जे.डी.(डब्ल्यूपीसी) / पीएच / बी- १००७- दि. ०२/०९/२०२० अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे अधिकारी सदर लोकसुनावणीस उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. जिल्हाधिकारी, जालना | : | अध्यक्ष |
| २. | प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद | : | सदस्य |
| २. | उप-प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, जालना | : | समन्वयक |

डॉ. योगिनी बाळंखे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ जालना तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सुरुवातीला सर्व

उपस्थितांचे स्वागत करुन जनसुनावणी समिती अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना थोडक्यात विषद केली.

भारत सरकार, पर्यावरण व वने मंत्रालय, नवी दिल्ली यांची अधिसुचना क्रं. एस.ओ.१५३३ दि. १४/०९/२००६ (दि. ०१/१२/२००९ सुधारित) नुसार सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका टिप्पणी आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर लोकसुनावणीचे आयोजन केले आहे.

पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठी रितसर अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दि. २६/०२/२०२० रोजी प्राप्त झाला होता. त्याअनूषंगाने मा. जिल्हाधिकारी जालना, तथा अध्यक्ष पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी यांच्या परवानगीने दिं. ०४/०९/२०२० रोजी पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी घेण्याबाबत जाहीरात दिं. ०३/०८/२०२० रोजी मराठी दैनिक सकाळ व दिं. ०४/०८/२०२० टाईम्स ऑफ इंडिया ईंग्रजी या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच सदर प्रकल्पाविषयी पर्यावरण मुल्यांकन अहवालाच्या सारांशाची माहिती असलेले दस्तावेज (इंग्रजी व मराठी) मध्ये संबंधीत ग्रामपंचायत कार्यालय व इतर शासकीय कार्यालयांमध्ये इच्छूक व्यक्तींना अभ्यासण्याकरिता उपलब्ध करून देण्यात आली होती. त्याअनुषंगाने आजची जाहीर लोक सुनावणी घेण्यात येत आहे.

सदर प्रकल्पाविषयी व पर्यावरण मुल्यांकन अहवालाच्या सारांशाची माहिती असलेले दस्ताऐवज (मराठी व इंग्रजी) मध्ये खालील कार्यालयामध्ये उपलब्ध करुन देण्यात आले होते.

- जिल्हाधिकारी कार्यालय, जालना.
- जिल्हा उदयोग केंद्र, जालना.
- जिल्हा परिषद, जालना.
- तहसिलदार, तहसिल कार्यालय जालना.
- ग्रामपंचायत कार्यालय, मौजे दरेगाव, ता. जि. जालना.
- उप-प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ जालना.
- प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद.
- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई (मुख्यालय).

- पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
- प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पुर्व विंग, नवीन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर.

उप-प्रादेशिक अधिकारी तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी नमुद केले की, अदयाप पावेतो उप-प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ जालना यांचेकडे कुठलेही आक्षेप, टिका टिप्पणी, तोंडी किंवा लेखी स्वरुपात प्राप्त झालेला नाही. कोणास कांही लेखी / तोंडी आक्षेप नोंदवायचे असतील तर ते सदर सुनावणी दरम्यान नोंदवू शकतात.

समन्वयक यांनी प्रकल्प धारकांस किंवा प्रतिनिधी यांना सादरीकरण करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

प्रकल्पाचे प्रतिनिधी मे. पोल्यूशन आणि इकोलॉजी कंट्रोल सर्व्हिसेस, नागपूर श्री. डॉ. प्रदिप पिपलटकर, प्रकल्प सल्लागार यांनी प्रकल्पाबददल विविध मुदयांवर सादरीकरण केले जसे की,- पर्यावरण प्रभाव मुल्यांकन आणि जाहीर जनसुनावणीचे प्रयोजन, प्रकल्पाचा तपशिल, प्रकल्पाचा आराखडा, पर्यावरण सदयस्थितीचा अभ्यास, स्थानीक पर्यावरणाचा तपशील व परिसराची माहिती, अभ्यास स्थळाची माहिती, अध्ययन क्षेत्रातील हवेचा दर्जा, अध्ययन क्षेत्रातील ध्वनीची तीव्रता, अध्ययन क्षेत्रातील पाण्याची गुणवत्ता, अध्ययन क्षेत्रातील मातीची गुणवत्ता, जैव पर्यावरण, सामाजिक आर्थीक पर्यावरण, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, विविध पर्यावरण विषयक परिणामांच्या उपाय योजना, पर्यावरण जबाबदारी योजने अंतर्गत सामाजिक-आर्थीक कल्याण उपक्रम, पर्यावरण व्यवस्थापन खर्चाची तरतूद, प्रकल्पाचे फायदे इत्यादी.

सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डींग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इतिवृत्तांमध्ये नोंद करण्यात आली आहे.

प्रकल्प सल्लागारांनी सदर प्रकल्पाचे सादरीकरण समाप्त केल्यानंतर डॉ. योगिनी बाळंखे यांनी सार्वजनिक सहभागींना विनंती केली कि, सदर प्रकल्पासंबंधी जर कुणाला काही प्रश्न,

सूचना, आक्षेप असतील तर ते त्यांनी त्यांचे नाव व गावाचे नाव सांगून विचारावेत. आणि प्रकल्प प्रवर्तकाने त्याचे समाधानकारक उत्तर द्यावे.

जाहीर लोकसुनावणी दरम्यान सार्वजनिक सहभागींनी सदर प्रकल्पासंबंधित काही प्रश्न, सुचना, आक्षेप उपस्थित केले ते खालील प्रमाणे आहेत.

१. श्री. गणेश परमेश्वर ढवळे, रा. दरेगाव यांनी मुददा उपस्थित केला की, कंपनीमधून जो धूर निघणार त्यासाठी काय करणार ?
२. श्री. किसनराव बाबूराव तिरूखे, सरपंच, दरेगाव यांनी मुददा उपस्थित केला की, कंपनीमध्ये स्थानिक लोकांसाठी कामगारामध्ये काही राखीव कोटा ठेवणार आहे का?
३. श्री. ज्ञानेश्वर ढवळे रा. दरेगांव यांनी असे नमूद केले की, नविन प्रकल्प हा खूप चांगला आहे आणि तो प्रत्यक्ष करण्यात यावा अशी त्यांनी कंपनीचे संचालक यांना विनंती केली. दरेगावातील तरून लोकांना जास्तीत जास्त रोजगार उपलब्द करून दयावा आणि त्यात त्यांना प्राधान्या दयावे अशी विनंती केली. या प्रकल्पामध्ये पर्यावरण व वृक्षारोपण बाबत प्रस्ताव दिलेला आहे हे ही खूप चांगले आहे. या प्रकल्पाबाबत गावातील लोकांची काहीही अडचण नाही जर कोणाला काही आक्षेप असेल तर त्यांनी त्यांची तक्रार नोंदवाही असेही त्यांनी नमूद केले.
४. श्री. गणेश तूकाराम ढवळे, माजी सरपंच, दरेगाव, रा. दरेगाव यांनी सर्वप्रथम मा. जिल्हाधिकारी, जालना यांचे स्वागत केले तसेच सर्व अधिकारी यांचेही स्वागत केले. त्यांनी कंपनीचे संचालक यांना पुढिल भावीवाटचालीसाठी शूभेच्या दिल्या. त्यानंतर त्यांनी, नविन लेबर कॉन्ट्रक्ट निर्माण करूण गावातील यूवा तरूण वर्ग यांना संधी देण्यात यावी अशी सूचना केली तसेच मा. जिल्हाधिकारी यांना विनंती केली की सन २०१६ पर्यंत सदरील एमआयडीचा टॅक्स हा दरेगाव ग्रामपंचायत ला मिळत होता परंतू सन २०१७ पासून मिळत नाहीये तर आपल्या स्तरावर सदरील टॅक्स हा दरेगाव ग्रामपंचायत ला मिळावा यासाठी मदत करावी. त्यांनतर त्यांनी वृक्षारोपण बददल सूचना केली की, आपण ३००० ते ५००० वृक्ष लागवड करणार आहात त्यापैकी १००० केशर आंबा लागवड करावी आाणि त्यातील सगळे वृक्षा जगतील याची खात्री देतो असे सांगितले.

५. श्री. वामन  ज्ञानेश्वर ढवळे, रा. दरेगाव, यांनी मुददा उपस्थित केला की, धूरापासून आम्हाला काही त्रास निर्माण होईल का?

६. श्री. रोहीत अशोक ढवळे रा. दरेगाव यांनी मुददा उपस्थित केला की, धूळीमूळे शेतीमालाचे जे नूकसान होते त्यासाठी काय उपाययोजना करणार आहात?

७. श्री. विष्णू गोविंद बनकर रा. सिरसवाडी, यांनी मुददा उपस्थित केला की, कंपनीचे घाण पाणी व धूषीत पाणी निघणार यासाठी काय उपाययोजना करणार आहात?

८. श्रीमती. कविता शामराव विरशे, रा. चंदनझिरा, यांनी मुददा उपस्थित केला की, महिलासांठी या कंपनीत काही सूविधा राहतील काय?

९. श्री. किरण प्राकाश कूलकर्णी, रा. जालना, यांनी विनंती केली की, या नविन प्रकल्पाच्या माध्यमातून रोजगार निर्मिती व्हावी व आम्हाला संधी मिळावी.

१०. श्रीमती. सुरेखा लंगोटे, रा. म्हाडा कॉलनी, जालना यांनी मुददा उपस्थित केला की, आम्हा महिलांसाठी येथे काम मिळेल का?

११. श्री. जनार्धन संपतराव चौधरी, पंचायत समिती,जालना यांनी मुददा उपस्थित केला की, सदरील नविन प्रकल्प हा दरेगाव पासून अवघ्या १ ते १.५० कि.मी. अंतरावर आहे. धूर न होण्यासाठी काळजी घ्यावी तसेच आपण रोजगार मध्ये जी आकडेवारी दाखवली त्याप्रमाणे आमच्या दरेगाव गावातील लोकांना जास्तीत जास्त रोजगार निर्माण करून दयावा अशी विनंती केली.

१२. श्री. एम.बी. कोरके, ग्रामसेवक दरेगाव यांनी मुददा उपस्थित केला की, आपण या प्रकल्प प्रस्तावामध्ये म्हंटल्याप्रमाणे गावांना विकास साठी दत्तक घेणार आहात. ग्रामपंचायत कार्यकारीणी तसेच मी सचिव या नात्याने विनंती करतो की दरेगाव हे गाव प्रकल्पासून जवळ असल्यामूळे दरेगावाला दत्तक घेवून गावाची विकासकामे करण्यास मदत करावी अशी विनंती केली.

वरिल सर्व मुददयांवर प्रकल्पाचे प्रतिनीधी श्री. डी.बी. सोनी यांनी त्यांच्याकडून करण्यात येणा-या उपाय योजनांची माहिती दिली. सुरूवातीला उद्योगांचे प्रतिनीधी श्री. डी.बी. सोनी यांनी सदर जाहीर लोक सुनावणीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, जालना तसेच सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद व उपस्थित सर्व नागरिक, गावकरी यांचे

स्वागत केले. नागरिकांनी प्रश्न, टिका, सूचना, आक्षेप उपस्थित केले आहेत त्याअनूषंगांने कंपनीचे प्रतिनीधी श्री. डी.बी. सोनी यांनी नागरिकांच्या सर्व प्रश्नावर उजळणी केली. सर्वप्रथम महिलांच्या रोजगाराबददल त्यांनी सांगितले की, भारतातील जालना एमआयडीसी ही स्टिल उद्योगामंध्ये अशी एमआयडी आहे जेथे महिलांना रोजगार दिलेला आहे. ज्यामध्ये सोपे काम जसे स्वच्छता व इतर पॅकिंगचे कामे महिलांना दिली जातात. तसेच त्यांनी आनंदाने सांगितले त्यांच्या कंपनीमध्ये महिला हयूमन रिसोर्स (HR Department) मध्ये काम करतात तसेच कंपनीमध्ये पूरुषांप्रामाणेच इंजिनियर सुदधा आहेत. महिंलाच्या विकासासाठी कटिबध्द अशी प्रवर्तकांची मानसिकता आहे. तसेच महिलांबाबत कूठल्याही प्रकारचा भेदभाव होणार नाही याचीही काळजी घेण्यात येईल. तसेच त्यांना कमी मेहनतीचे काम असलेल्या ठिकाणीच त्यांच्यासाठी रोजगार निर्मिती करुन देण्यात येईल.

तदनंतर धूरांच्या प्रश्नावर त्यांनी असे सांगितले की, स्टिल निर्माण करताना जो धूर निघतो तो साधारणता हवेबरोबर मिसळण्याची त्याची प्रवृत्ती असते ती रोखण्यासाठी नविन अद्यावत यंत्रणा या उद्योगात कार्यरत असणार आहे. ज्यामध्ये शेडला जास्तीत जास्त बंद करण्यात येणार आहे, शेडच्या बाहेर धूर जाणार नाही याचीही काळजी घेण्यात येणार आहे. तसेच हवेची गूणवता वेळोवेळी महाराष्ट्र नियंत्रण मंडळाकडून तपासण्यात येणार आहे. त्यामूळे धूरामूळे कूठल्याही प्रकारचे नूकसान होणार नाही याची पूर्ण दक्षता घेण्यात येईल.

तदनंतर नागरिकांनी उपस्थित केलेल्या घाण पाणी अथवा दुषित पाण्याच्या मुददयावर प्रतिनीधी श्री. डी.बी. सोनी यांनी नमूद केले की, सदर प्रस्तावित प्रकल्पामधून औद्योगिक प्रक्रियेतून कुठलेही घाण पाणी निघणार नाही. परंतू घरगूती प्रकारचे सांडपाणी निघेल ज्यावर प्रक्रिया करून ते झाडांसाठी वापरले जाईल. तसेच कूलींग टॉवर साठी जे पाणी वापरले जाईल ते पूर्णपणे recycle केले जाईल.

त्यानंतर पुढे स्लॅग/घनकचराबाबत बोलताना प्रतिनीधी श्री. डी.बी. सोनी यांनी सांगितले की, उद्योगामधून निर्माण होणारा स्लॅग हा बारीक करून बांधकामासाठी वापरला जाईल. तसेच पुढे त्यांनी यात नमूद केले की, त्यांचा चालू स्थितीत असणा-या उद्योगांच्या समूहाने IIT Rurkee यांच्यासोबत स्लॅग च्या आणखी योग्य वापराबाबत करार करून दोन पीएचडी विद्यार्थ्यांचे नाव प्रस्तावित केले आहे.

प्रतिनीधी श्री. डी.बी. सोनी यांनी धूरामूळे शेतीमालावर होणा-या नूकसानीबाबत असे नमूद केले की, अदययावत हवा प्रदूषण संयंत्रणा बसविल्यानंतर शेतजमीनीवर धूरामूळे कूठलेही नूकसान निश्चितच होणार नाही तसेच त्याची हमीदेखील त्यांनी दिली.

सदर जाहीर लोक सुनावणीचे सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांनी काही सुचना प्रकल्प धारकास केल्या. त्यांनी हवेची दिशा मुख्यत्वे कोणत्या गावाकडे आहे ते स्पष्ट करून त्याची काळजी घ्यावी. तसेच हवा प्रदूषण नियंत्रण संयंत्रणा सतत चालू ठेवावी जेणेकरून हवेचे प्रदूषण होणार नाही. उद्योगाच्या EIA मध्ये त्यांनी पाण्याचा स्त्रोत जमीनीखालील पाणी सांगितलेला आहे. त्याचे स्पष्टीकरण दयावे आणि तसे असेल तर त्यांनी CGWA ची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसेच झाडांची लागवड TOR मधील नमूद असलेली झाडांची लागवड करावी. त्याव्यतिरिक्त त्यांना अन्य झाडे लावली तर ती अतिरिक्त असावी यावर समन्वयक डॉ. योगिनी बाळंखे यांनी प्रतिनिधींना विनंती केली की त्यांनी प्रादेशिक अधिकारी यांनी जे मुददे उपस्थित केले त्याचे लेखी स्पष्टिकरण दयावे जेणेकरून ते इतिवृत्ता सोबत जोडता येईल.

सदर जाहीर लोक सुनावणीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, जालना यांनी सर्वप्रथम उपस्थितांचे स्वागत करून नागरिकांनी उपस्थित केलेल्या मुददयांची थोडक्यात उजळणी केली. त्यानंतर उद्योग उभारणी बाबत उद्योग प्रतिनिधीना काही सुचना केल्या. त्यात प्रामुख्याने झाडे लावण्याविषयी असे सांगितले की, TOR मधील नमूद असलेली झाडे तर लावावीतच परंतु नागरिकांच्या विनंती नूसार आंब्याची झाडे लावायची असल्यास ती लावून त्याचे नीट संगोपन करावे आणि अशी झाडे ही TOR मधील झाडांव्यतिरिक्त असली पाहिजेत. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियत्रांण मंडळाच्या अधिका-यांनी ज्या सूचना केल्या आहेत त्याचे देखील तंतोतंत पालन करण्यात यावे.

डॉ. योगिनी बाळंखे यांनी जाहीर लोकसूनावणी समितीचे अध्यक्ष व सदस्य यांच्या परवानगीने सार्वजनिक सहभागींचे आभार मानून प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोक सूनावणी समाप्त केली.

शेवटी अध्यक्षांचे आभार मानून जाहीर लोकसूनावणी संपन्न झाली.

**(डॉ. प्रविण जोशी)**
सदस्या

**( डॉ. योगिनी बाळंखे)**
समन्वयक


पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती

तथा
प्रादेशिक अधिकारी
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद

तथा
उप प्रादेशिक अधिकारी
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जालना

**( रविंद्र बिनवडे )**
अध्यक्ष
पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती
तथा
जिल्हाधिकारी, जालना
21/9/2020


महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD
SUB-REGIONAL OFFICE, JALNA
ENVIRONMENTAL PUBLIC HEARING


महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
उप-प्रादेशिक कार्यालय, जालना.
MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD
SUB-REGIONAL OFFICE, JALNA
पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी
ENVIRONMENTAL PUBLIC HEARING
लोकसुनावणीची तारीख : ०४/०९/२०२० लोकसुनावणीची वेळ : सकाळी ११.०० वा.
स्थळ : मे.सप्तशृंगी अलॉयज प्रा.लि.गट नं.५१ व ५२ गांव दरेगाव.
ता.जालना जि.जालना








MEMBER









# "पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी"

मे. सप्तश्रृंगी अलॉयज प्रा. लि., गट नं. ५१ व ५२, गाव देरगाव, ता. जालना, जि. जालना या प्रस्तावित प्रकल्पामध्ये ४,६०,००० टी.पी.ए. एम.एस. बिलेट्स उत्पादनाकरिता प्रवर्तन भट्टी व ४,५०,००० टी.पी.ए. टी.एम.टी. बारस चे उत्पादन करणेबाबत पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी

दिनांक :- ०४/०९/२०२०  वेळ :- सकाळी ११.०० वा.

ठिकाण :- मे. सप्तश्रृंगी अलॉयज प्रा. लि.
गट नं. ५१ व ५२, गाव देरगाव,
ता. जालना, जि. जालना
[प्रस्तावित स्थळ]

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव व हुद्दा | पदनाम | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| १. | श्री. रविंद्र बिनवडे, जिल्हाधिकारी जालना. | अध्यक्ष | Rawt 4/9/2020 |
| २. | श्री. डॉ. पी.एम. जोशी, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद | सदस्य | [signature] 4/9/2020 |
| ३. | श्रीमती डॉ. योगिनी बाकरे, उपप्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, जालना. | समन्वयक | Byogini 4/9/2020 |

"पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी"

मे. सप्तश्रृंगी अलायॅज प्रा.लि., गट नं ५१ व ५२, गाव दरेगाव ता. जालना, जि. जालना या प्रस्तावित प्रकल्पामध्ये ४,६०,००० टी.पी.ए. एम.एस. बिलेट्स उत्पादनाकरिता प्रवर्तन भट्टी व ४,५०,००० टी.पी.ए. टी.एम.टी बारस चे उत्पादन करणेबाबत पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी

दिनांक:- ०४/०९/२०२० वेळ:- सकाळी ११.०० वा.

ठिकाण:- मे. सप्तश्रृंगी अलॉयज प्रा.लि.
गट नं. ५१ व ५२, गाव दरेगाव,
ता. जालना, जि. जालना
[प्रस्तावित स्थळ]

| अ.क्र. | उपस्थितांचे नाव | पत्ता व गावाचे नाव | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| 1 | जनार्दन रूपन चौधरी | दरेगाव | [signature] |
| 2 | अशोक खनखर | सिरसवाडी | [signature] |
| 3 | बाबासाहेब बोबडे | दरेगाव | [signature] |
| 4 | विश्राम वाघामारे | सिरसवाडी | VISkal |
| 5 | Solan Pandit | Daregaon | Solan |
| 6 | पांडुरंग शिंदे | दरेगाव | [signature] |
| 7 | ज्ञानेश्वर जऱ्हाड | कुंभेफळ (जालना) | [signature] |
| 8 | उषा बनसोडे | संजनगर | उषा |
| 9 | कांता | जालना | [signature] |
| 10 | काशीनाथ लंगोटे | कारला | काशीनाथ |
| 11 | संतोष मंडळ | मालीपुरा | संतोष |
| 12 | जयश्री हेसर | भवानीनगर | जयश्री |

| अ. क्र. | उपस्थितांचे नाव | पत्ता व गावाचे नाव | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| 13 | लक्ष्मण जिवनाजी ढवळे | देरेगाव | [signature] |
| 14 | शरद तुकाराम कोरधने | देरेगाव | [signature] |
| 15 | कैलास तेजराव चव्हाण | माळवा | [signature] |
| 16 | रामकिसन ढवळे | देरेगाव | [signature] |
| 17 | संदीप आचार्य | आळंद | [signature] |
| 18 | Kapil Kulkarni | Jalna | [signature] |
| 19 | Shaikh Altaf | Jalna | [signature] |
| 20 | [illegible] विलास परळकर | माळवा | [signature] |
| 21 | महेंद्र गिरी | देरेगाव | [signature] |
| 22 | परमेश्वर पाळेकर | [illegible] | [signature] |
| 23 | पवन बारसे | माळवा | [signature] |
| 24 | रुखदेव काशीनाथ ढवळे | देरेगाव | रुखदेव ढवळे |
| 25 | अशोक बाबुराव ढवळे | देरेगाव | [signature] |
| 26 | किसनराव बाबुराव शिरसे | देरेगाव (सरपंच | [signature] |
| 27 | एम. बी. कोरडे | — | [signature] |
| 28 | गणेश तुकाराम ढवळे | देरेगाव माजी सरपंच | [signature] |
| 29 | शिवशंकर भाऊराव शिरसे | देरेगाव | [signature] |
| 30 | आत्माराम जनार्धन वाघरे | देरेगाव | [signature] |
| 31 | हिंमतराव बाबुराव कोरडे | देरेगाव | [signature] |
| 32 | गणेश हरिभाऊ आहिरे | देरेगाव | [signature] |
| 33 | गणेश परमेश्वर ढवळे | देरेगाव | [signature] |
| 34 | ज्ञानेश्वर बाबासाहेब ढवळे | देरेगाव | [signature] |
| 35 | गणेश भगवान कुलवे | देरेगाव | [signature] |
| 36 | किशोर बाबुराव शिरसे | देरेगाव | [signature] |
| 37 | [illegible] | शिरसवाडी | [signature] |
| 38 | Uday Singh | Chandanzira | [signature] |
| 39 | बाबासाहेब रामभाऊ आहिरे | देरेगाव | बाबासाहेब |
| 40 | वामन ज्ञानेश्वर ढवळे | देरेगाव | [signature] |
| 41 | शिवाजी केशवराव ढवळे | देरेगाव | [signature] |
| 42 | Rohit Ashok Dhawale | देरेगाव | [signature] |

| अ. क्र. | उपस्थितांचे नाव | पत्ता व गावाचे नाव | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| 43 | नारायण भुसारे | बदनापूर | भुसारे |
| 44 | सुरेश अंबादास ठाकरे | शिरसोडी | [signature] |
| 45 | ज्ञानेश्वर एकनाथ वायभट | शिरसोडी | [signature] |
| 46 | आकाश ज्ञानेश्वर खरात | जालना | [signature] |
| 47 | शिवाजी राईब | पारेगाव | राईब |
| 48 | चरणा शिंदे | प्रोरनेर | [signature] |
| 49 | भीमराव | इंदेवाडी | बोराडे |
| 50 | महेश कुडानीयाँ | योगेश्वरी कॉलोनी | महेश |
| 51 | ज्ञानेश्वर खरात | इंदिरानगर | खरात |
| 52 | राम प्रभाकर खोत | चंदनझिरा | [signature] |
| 53 | भगवान मोगले | चंदनझिरा | भगवान |
| 54 | कृष्णा गोर्डे | [illegible]गाव | [signature] |
| 55 | सुनिल चव्हाण | जालना | [signature] |
| 56 | नरसरनाम जोग | जालना | [signature] |
| 57 | वेणुगोपाल शर्मा | जालना | [signature] |
| 58 | प्रभाकर तौर | जालना | [signature] |
| 59 | अरुण कुलकर्णी | चंदनझिरा | [signature] |
| 60 | कृष्णा धायाळ | जालना | [signature] |